# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 16 November 2024

## Time: 7.10 to 7.20 AM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १६ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

*ठळक बातम्या*

- **विधानसभा निवडणूक प्रचाराचे अखेरचे तीन दिवस शिल्लक-प्रचारसभांसोबत प्रचार फेऱ्या आणि कॉर्नर बैठकांवर उमेदवारांचा भर**
- **केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची हिंगोलीतल्या सभेत काँग्रेसवर कडाडून टीका ;तर काँग्रेसकडून भाजपला जातनिहाय जनगणनेची भूमिका स्पष्ट करण्याचं आव्हान**
- **छत्रपती संभाजीनगर इथल्या मद्यनिर्मिती कारखान्यात चार कामगारांचा अपघाती मृत्यू**

**आणि**

- **दक्षिण आफ्रिकेचा चौथ्या टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यात १३५ धावांनी दणदणीत पराभव करत भारताचा मालिकाविजय**

***सविस्तर बातम्या***

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचे अखेरचे तीन दिवस शिल्लक आहेत. या पार्श्वभूमीवर प्रचारसभा, प्रचार फेऱ्या, कॉर्नर बैठका आणि घरोघरी जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेण्यावर सर्वच प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांसह स्थानिक छोट्या पक्षाचे उमेदवार तसंच अपक्ष उमेदवारांचा भर दिसून येत आहे. पारंपरिक पद्धतीने रिक्षांवर भोंगे लावून प्रचार करण्याला जवळपास सर्वच उमेदवारांनी पसंती दिल्याचं पहायला मिळत आहे.

****

केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी काल हिंगोली इथं रामलीला मैदानावर महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचार सभा घेतली. महायुती सरकारने राबवलेल्या योजनांचा आढावा घेतांनाच, शहा यांनी काश्मीरमधून हटवलेल्या कलम ३७० च्या मुद्यावरून काँग्रेस पक्षावर तर हिंदुत्वाच्या मुद्यावरून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर कडाडून टीका केली.

दरम्यान, शहा यांचं हिंगोलीत आगमन होताच, निवडणूक आयोगाच्या पथकाकडून त्यांच्या बॅगांची तपासणी करण्यात आल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

सोयाबीन खरेदी करताना किमान आधारभूत किंमतीतली तफावत दूर करण्यासाठी भावांतर योजना लागू करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे. काल नांदेड इथल्या प्रचारसभेत ते बोलत होते. दरम्यान, कांद्याची बेकायदा साठवणूक करणाऱ्या कांदा व्यापाऱ्यांवर संबंधित अधिनियमांनुसार कठोर कारवाईचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी अन्न आणि नागरी पुरवठा तसंच पणन विभागाला दिले आहेत.

दरम्यान, परभणी मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार आनंद भरोसे यांच्या प्रचारासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांनी काल सभा घेतली.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या सिल्लोड इथं महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेश बनकर यांच्यासाठी प्रचार सभा घेतली. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यावर जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर राहतील, तसंच सोयाबीनला सात हजार रूपये भाव मिळेल अशी ग्वाही ठाकरे यांनी यावेळी बोलताना दिली.

****

जातनिहाय जनगणनेबाबत भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपली भूमिका जाहीर करावी, असं आव्हान काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिलं आहे. ते काल मुंबईत वार्ताहर परिषदेत बालत होते. काँग्रेस अनुसूचित जाती-जमातींचं आरक्षण  संपवणार असल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. काँग्रेसनेच आरक्षण देऊन मागास जातींना हक्क आणि अधिकार दिले, असं चेन्निथला यांनी नमूद केलं.

दरम्यान काँग्रेस नेते राहुल गांधी तसंच प्रियंका गांधी आज राज्यात प्रचार सभा घेणार आहेत. राहुल गांधी यांच्या आज चिमूर आणि धामणगाव रेल्वे इथं प्रचार

सभा होणार असून, प्रियंका गांधी आज शिर्डी आणि कोल्हापुरात, तसंच उद्या गडचिरोली आणि नागपूरमध्ये प्रचारसभा घेतील, असं चेन्नीथला यांनी सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पक्षाचे नेते विधिज्ञ प्रकाश आंबेडकर आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर येत आहेत. आज सायंकाळी आंबेडकर यांची आमखास मैदानावर प्रचार सभा होणार आहे.

****

विधानसभा निवडणुकीचं प्रत्यक्ष मतदान अवघ्या पाच दिवसांवर येऊन ठेपलं आहे. या पार्श्वभूमीवर मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी 'मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागासाठी सुनियोजित कार्यक्रम' –स्वीप उपक्रमांतर्गत पारंपरिक माध्यमांसोबतच अनेक अभिनव उपक्रमांच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात जनजागृती सुरू आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं हॉट एअर बलून राईडच्या माध्यमातून मतदार जनजागृती केली जाणार आहे. महापालिकेचे उपायुक्त तथा जिल्हा स्वीप नोडल अधिकारी अंकुश पांढरे यांनी याबाबत अधिक माहिती दिली...

*Byte...*

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून देशातील दूरचित्रवाणी वाहिन्यांवर निवडणुकांसंबंधित प्रसारित होणाऱ्या बातम्यांवर लक्ष ठेवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मीडिया मॉनिटरिंग केंद्र स्थापन करण्यात आलं आहे. महाराष्ट्रात मतदान दिवसाच्या एक दिवस आधी तसंच मतदानाच्या दिवशी दूरचित्रवाणी वाहिन्यांवर प्रसारित होत असलेल्या प्रत्येक बातमीवर लक्ष ठेवण्याचं काम केंद्रीय निवडणूक आयोगाकडून होणार आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठी मतदान करण्याचं आवाहन सर्व मतदारांना करण्यात येत आहे. जालना इथला अभियांत्रिकी शाखेचा विद्यार्थी असलेला कैवल्य जोशी या नवमतदारानेही सर्वांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे...

*Byte...*

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज कोल्हापूर जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

***या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन देत आहोत***

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या शेंद्रा औद्योगिक वसाहतीत काल दुपारी एका मद्यनिर्मिती कारखान्यात मका साठवण टाकी फुटल्याने चार कामगारांचा मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले. रॅडिको डिस्टलरी नावाच्या कारखान्यात ही दुर्घटना झाली. मका साठवण्याची टाकी खालून फुटल्याने या टाकीला वेल्डिंग करत असतांना, टाकी कोसळल्याने कैक क्विंटल मका तसंच टाकीचे पत्रे, काम करत अस मजुरांच्या अंगावर पडल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान काल जोहान्सबर्ग इथं झालेल्या टी – ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत चौथ्या आणि शेवटच्या सामन्यात भारतीय संघानं यजमान संघाचा १३५ धावांनी दणदणीत पराभव करत, चार सामन्यांची मालिका ३–१ अशी जिंकली. भारतीय संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत निर्धारित षटकांत एक बाद २८३ धावा केल्या. तिलक वर्माने ४७ चेंडूत १२० धावा केल्या, तर संजू सॅमसनने ५६ चेंडूत १०५ धावा केल्या. अर्शदीप सिंगने तीन बळी घेतले. विजयासाठी २८४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा डाव १८ षटक दोन चेंडूत १४८ धावांवर संपुष्टात आला. नाबाद १२० धावा करणारा तिलक वर्मा सामनावीर तसंच मालिकावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

****

गोव्यातील पणजी इथं होणाऱ्या ५५ व्या 'इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडिया' अर्थात 'इफ्फी'मध्ये झळकण्याचा मान 'हजारवेळा शोले पाहिलेला माणूस' या बहुचर्चित मराठी चित्रपटाला मिळाला आहे. या चित्रपटाला गाला प्रीमियर आणि रेड कार्पेटचा सन्मान जाहीर झाला असून २४ नोव्हेंबरला हा सोहळा होणार आहे. या चित्रपटाच्या नावातूनच शोले या गाजलेल्या चित्रपटाशी कथेचा संबंध असल्याचं जाणवतं, या नावामुळेच त्याच्या कथानकाविषयी उत्सुकता निर्माण झाली

आहे. चित्रपटात दिलीप प्रभावळवकर, सोनाली कुलकर्णी, सिद्धार्थ जाधव, आदी कलावंत प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.

****

शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक यांची ५५५ वी जयंती काल सर्वत्र भक्तिभावानं आणि उत्साहात साजरी झाली. गुरु नानक जयंतीनिमित्त नांदेडच्या सचखंड गुरुद्वाऱ्यासह विविध गुरुद्वाऱ्यांमध्ये शबद, भजन, कीर्तन इत्यादी धार्मिक कार्यक्रमांमध्ये शीख बांधव मोठ्या संख्येनं सहभागी झाले.

****

कार्तिकी पौर्णिमा अर्थात त्रिपुरारी पौर्णिमाही काल साजरी झाली. या पार्श्वभूमीवर राज्यात ठिकठिकाणी दीपोत्सव साजरा झाला. कार्तिक पौर्णिमेनिमित्त बीड जिल्ह्यातल्या श्री क्षेत्र कपिलधार इथं दोन दिवसांच्या यात्रोत्सवाला सुरूवात झाली. संत मन्मथस्वामी यांच्या समाधी स्थळी दर्शनासाठी विविध ठिकाणांहून दिंड्यांचे आगमन झालं असून भाविकांनी मध्यरात्रीपासूनच दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आचारसंहिता अंमलबजावणीसाठी नियुक्त स्थिर सर्व्हेक्षण पथकानं गुरुवारी रात्री सिल्लोड मतदार संघात निल्लोड फाटा इथं १९ किलो सोने आणि ३७ किलो चांदी जप्त केली. याची किंमत अंदाजे १९ कोटी रुपयांची आहे,असं आचारसंहिता कक्षाचे सहायक नोडल अधिकारी राजेंद्र देसले यांनी कळवलं आहे.

****

लातूर जिल्ह्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून भरारी पथकं आणि स्थिर निगराणी पथकांनी जवळपास ४२ लाख ३३ हजार ४०० रुपयांची रोकड जप्त केली. या बाबत पुढची सुनावणी १८ नोव्हेंबरला होणार आहे.

दरम्यान, लातूर जिल्ह्यात ११ नोव्हेंबरपासून गृह मतदान सुरु आहे. लातूर शहर मतदारसंघात ३६८ मतदारांपैकी ३४९ जणांनी काल गृहमतदान केलं. यामध्ये १०० वर्षांवरील १० मतदारांचा समावेश आहे. उदगीर मतदारसंघात जवळपास ६२६ मतदारांनी या सुविधेअंतर्गत आपला मतदानाचा अधिकार बजावला. यामध्ये करडखेल इथल्या वयाची १०५ वर्षे पूर्ण केलेल्या मतदार जिजाबाई किसन कसबे यांचाही समावेश आहे.

****